<u>रे.मु.नं. ९५४/२०१३ मधील नि.३८ वरील आदेश</u>

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादीने त्याचेविरूध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करून वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२ प्रतिवादी असे कथन करतो की, सदर प्रकरणात त्याने त्याचे विधीज्ञ बदलले होते. त्यास माहीती व आवश्यक कागदपत्रे पाहता न आलयामूळे तसेच त्याचे माहीतगार विधीज्ञ परगावी गेल्यामूळे त्याचेविरूध्द उलटतपास नाहीचे आदेश पारीत झाले आहेत. त्याचे पुढे असे कथन आहे कि, दावा मिळकती संदर्भात वादी व प्रतिवादी यांच्यात गंभीर तक्रारी आहेत. प्रतिवादीस वादीचा उलटतपास घेणे जरूरीचे आहे. तसे न झाल्यास त्याचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. याउलट वादीचे काहीही नुकसान होत नाही. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

३ वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून तिचा आक्षेप नोंदविला आहे. तिच्या मते, प्रतिवादीच्या कथनापृष्ठयर्थ कोणतेही कागदोपत्री पुरावे दाखल केलेले नाहीत. त्याचे विधीज्ञ मूद्दामहून प्रकरण प्रलंबीत ठेवण्यासाठी गैरहजर राहीले. अर्जास कोणतेही सबळ व कायदेशीर कारण नाही. त्यामूळे अर्ज नामंजूर करावा व मंजूर केल्यास प्रतिवादीकडून खर्च रू २५००/— मिळावा अशी विनंती वादीने केली आहे.

४ उभयपक्षाच्या विद्वान वकिल युक्तीवाद करण्यास असमर्थ ठरले. सदरचा अर्ज मी गूणदोषावंर निकाली करत आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादीविरूध्द दि.२४.७.१७ रोजी उलटतपास नाही असे आदेश पारीत केलेले आहेत. त्यानंतर पूढील तारखेस लगेचच प्रतिवादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तूत अर्ज दाखल करण्यास प्रतिवादीने तत्परता दाखविली आहे. उभयतांमधील वाद हा स्थावर मिळकतीबाबतचा आहे. वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे स्वरूप व त्यांच्या एकमेकांविरूध्दच्या तक्रारी पाहता तसेच नैसर्गिक न्यायतत्वानूसार प्रस्तुत प्रकरण गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादीस वादीचा उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. परंतू वादीस खर्चाची रक्कम देणेदेखील तितकेच उचीत वाटते. सबब वरील विवेचनावरून

मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. प्रतिवादीचा अर्ज रक्कम रू. २००/— इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. प्रतिवादी विरूध्द झालेला दि.२४.७.१७ रोजीचा उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीस पुढील तारखेपर्यत प्रस्तूत अर्जाचा खर्च देणे बंधनकारक राहील.

दि.०८.०१.२०१८ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क स्तर,बार्शी

## Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Lasane. |
| Court | : | 3rd JtCJJD & JMFC, Barshi. |
| Date: | : | 8/1/2018 |
| Judgment/Order signed by the presiding officer | : : | 8/1/2018 |
| Judgment/Order uploaded on | : : | 9/1/2018 |